जा.क्र/अभिलेख/ 10607/२०२५
जिल्हा न्यायालय, परभणी.
दिनांक : १८/०९/२०२५

# जाहीर प्रगटन

जिल्हा न्यायालय, परभणी, जिल्हा न्यायालय–१ गंगाखेड, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, परभणी, मुख्य न्यायदंडाधिकारी, परभणी, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मानवत/जिंतूर/पूर्णा येथील अभिलेख कक्षातील नाशवंत कागदपत्रांची अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय, परभणी येथे जमा असलेली रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी अधिकृत रद्दी खरेदी करणा–यांकडुन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

रद्दी खरेदी दाराने सदर कालबाहय अभिलेखाची फाडणी करण्यात आलेली रद्दी ही जिल्हा न्यायालय, परभणी येथुन प्राप्त करून घ्यावी.

ज्या कोणास सदर अभिलेख कक्षातील रद्दी खरेदी करावयाची आहे त्यांनी खरेदीचा दर आपले निविदेत दर्शवुन निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, परभणी यांचे नावे दिनांक ३०/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावी. निवीदेत दर्शवलेले दर हे पुढील दोन महिण्याकरीता लागु राहतील. जिल्हा न्यायालय, परभणी येथे दिनांक ०३/१०/२०२५ रोजी निविदा उघडण्यात येतील.

ज्यांची निविदा मान्य करण्यात येईल त्यांना जिल्हा न्यायालय, परभणी मार्फत अधिकृतरित्या कळविण्यात येईल. निविदा स्विकृत झालेल्या रद्दी खरेदी करणा–या व्यक्तींना सात दिवसाचे आत रद्दी खरेदी करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्यांची निवीदा रद्द करण्यात येईल व पुढील निवीदाधारकास खरेदी बाबत आदेश देण्यात येतील.

निविदा स्विकृत करणे किंवा रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हा न्यायालय, परभणी यांनी राखुन ठेवले आहेत.

आज दिनांक १८/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी हे जाहीर प्रगटन देण्यात येते.

आदेशान्वये

18/09/25

प्र.(प्रबंधक)
जिल्हा न्यायालय, परभणी.

DISTRICT COURT PARBHANI
सत्यमेव जयते

Scanned by CamScanner

प्रत माहितीस्तव व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्याकरीता :

१. जिल्हा न्यायालय, परभणी
२. दिवाणी न्यायालय व. स्तर, परभणी
३. मुख्य न्यायदंडाधिकारी, परभणी
४. जिल्हा न्यायालय--१ गंगाखेड
५. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मानवत/जिंतुर/पूर्णा
६. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
७. तहसिल कार्यालय, परभणी
८. महानगर पालिका, परभणी
९. संगणक प्रमुख, संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, परभणी यांनी सदरील जाहीर प्रगटण जिल्हा न्यायालय, परभणीचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

आदेशान्वये

(प्रबंधक)
जिल्हा न्यायालय, परभणी.

Scanned by CamScanner